क्रमांक : ८७८३ / ई-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २४ मार्च, २०१४.

**प्रेषक :**

**प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

**प्रति :**

**विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य.**

**विषय : मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्विकारण्याबाबत.**

**महोदय/महोदया,**

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सोमवार, दिनांक २ जून, २०१४ रोजी पासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या आगामी अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरिता गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री तसेच प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी नमूद असलेला चक्रानुक्रम पत्रक भाग दोन द्वारे सर्व मा.सदस्यांना **सोमवार, दिनांक २४ मार्च, २०१४ रोजी वितरित करण्यात येत आहे. (प्रत सोबत जोडली आहे).**

**महाराष्ट्र विधानपरिषदेतील तारांकित प्रश्नांच्या बॅलटपध्दतीबाबत विचारविनिमय करण्यासाठी दिनांक १२ मे, २०१० रोजी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या दालनात बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार आता विधानपरिषदेत एकच बॅलटपध्दती अवलंबिण्यात येणार आहे. त्यानुसार तारांकित प्रश्न सूचना देण्यासाठी मंगळवार, दिनांक १ एप्रिल, २०१४ रोजी मा.सदस्य स्वत: अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहिल्यास त्या दिवशी त्यांच्याकडून मा.सभापती यांच्या आदेशानुसार प्रत्येकी ३१ याप्रमाणे तारांकित प्रश्न सूचना, दुपारी १२.०० ते १.०० या वेळेत दालन क्रमांक १४५, पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे स्विकारण्यात येतील. सदर दिवशी स्विकारण्यात यावयाच्या प्रश्न सूचनांपैकी तारांकीत स्वीकृत झालेल्या प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट बुधवार, दिनांक ३० एप्रिल, २०१४ रोजी दुपारी १.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात येईल. सदरहू बॅलट प्रसंगी उपस्थित असलेल्या मा.सदस्यांच्या प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट पाच फे-यांमध्ये (१+२+३+५+उर्वरित) घेण्यात येईल व सदर बॅलटसाठी प्रश्न सूचना दिलेल्या मा.सदस्यांपैकी अनुपस्थित असलेल्या मा.सदस्यांच्या तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट अशाच प्रकारे पाच फेऱ्यांमध्ये तद्नंतर घेण्यात येईल. <u>सदर बॅलटकरिता अनुपस्थित राहणाऱ्या सदस्यांचे, त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींकडून किंवा अन्य सदस्यांकडून प्राधिकारपत्र (Authority Letter) न स्विकारण्याचा निर्णयही सदर बैठकीत घेण्यात आला आहे</u>.**

**तसेच संसदीय कार्य विभागाने तीन आठवडयांचा म्हणजेच दिनांक २ जून, २०१४ ते दिनांक २० जून, २०१४ रोजी पर्यंतचा कार्यक्रम कळविला असला तरी मा.सभापती,विधान परिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार सदर कार्यक्रमाशिवाय एका आठवडयाचा जादा कार्यक्रम चक्रानुक्रमात दाखविण्यात येत आहे.**

दिनांक १ एप्रिल, २०१४ रोजी प्राप्त झालेल्या प्रश्न सूचनांवरील कार्यवाहीबाबतचा तपशील बुधवार, दिनांक ३० एप्रिल, २०१४ रोजी या सचिवालयातील ई-१ कक्षात (कक्ष क्रमांक १३०४) मा. सदस्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या त्यांच्या प्रतिनिधींना उपलब्ध करून देण्यात येईल.



\\Mls-e1-01\e\Malankar\ALL SESSION\2 session 2014\rotation order.doc
रोटा/पच्चवी २६५२ (८००-३-२०१४)-१

**तसेच बुधवार,दिनांक २३ एप्रिल, २०१४ रोजीपासून दुसऱ्या टप्प्यातील तारांकित प्रश्न सूचना विधानपरिषद प्रश्न शाखा (१३ वा मजला, कक्ष क्रमांक १३०४) विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.०० वाजल्यापासून स्विकारण्यात येतील. सदर प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत होणारे प्रश्न, दिनांक ३० एप्रिल, २०१४ रोजी होणाऱ्या बॅलटच्या प्रश्नांनंतर, त्या प्रश्नांच्या अनुक्रमांकानुसार तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीत समाविष्ट करण्यात येतील.**

एम.के.सी.एल. संस्थेमार्फत प्रायोगिक तत्वावर अवलंबविण्यात येणाऱ्या संगणक प्रणालीद्वारे (QIS) व (Manual) पध्दतीने तारांकित प्रश्नांवरील कार्यवाही करावयाची असल्यामुळे विहित मुदतीपेक्षा एक आठवडा आधी प्रश्न सूचना स्वीकारण्यात येत आहेत.

कृपया याची नोंद घ्यावी अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

**( ला.ना.जाधव )**
अवर सचिव (समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत माहितीसाठी :-**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

\\Mls-e1-01\e\Malankar\ALL SESSION\2 session 2014\rotation order.doc

## महाराष्ट्र विधानपरिषद

क्रमांक : २२

पत्रक भाग दोन

सोमवार, दिनांक २४ मार्च, २०१४/ चैत्र ३, १९३६ (शके)

### महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१४ मधील दुसऱ्या अधिवेशनातील (माहे जून,२०१४) तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम

२५. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१४ मधील दुसऱ्या अधिवेशनातील **(माहे जून, २०१४)** कालावधीकरिता माननीय मंत्र्यांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी माननीय सभापतींनी पुढीलप्रमाणे दिवस नेमून दिले आहेत. ज्या दिनांकास प्रश्नांचे उत्तर हवे असेल तो दिनांक विवरणाच्या स्तंभ (३) मध्ये दर्शविलेला असून त्या दिवशी विचारावयाच्या प्रश्नांच्या सूचना या सचिवालयास मिळण्याचा अखेरचा दिनांक विवरणाच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविलेला आहे. (प्रश्नांच्या सूचना मिळण्याच्या अखेरच्या दिनांकास सुट्टी असेल त्यावेळी त्या पूर्वीचा दिनांक दर्शविण्यात आला आहे.)

आगामी अधिवेशनासंबंधातील दिनदर्शिकेतील आखलेल्या कार्यक्रमात बदल झाल्यास त्यानुसार प्रस्तुत चक्रानुक्रमात बदल होईल.

मा.सदस्यांना प्रश्नांच्या सूचना देण्यास मदत व्हावी म्हणून माननीय मंत्री आणि त्यांच्या अधीन असलेले विभाग यांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे **(पृष्ठ क्रमांक ३ व ४)**

**मंगळवार, दिनांक १ एप्रिल, २०१४ रोजी स्विकारण्यात येणाऱ्या तारांकित प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्विकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट बुधवार, दिनांक ३० एप्रिल, २०१४ रोजी दुपारी १.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई येथे मा.सदस्यांच्या उपस्थितीत घेण्यात येईल. सदरहू बॅलटसाठी उपस्थित राहणा-या मा.सदस्यांना प्रवास किंवा दैनिक भत्ता मिळणार नाही. तसेच बुधवार, दिनांक २३ एप्रिल, २०१४ रोजी पासून स्विकारण्यात येणाऱ्या प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत होणारे प्रश्न बुधवार, दिनांक ३० एप्रिल, २०१४ रोजी होणाऱ्या बॅलटसाठी घेण्यात येणाऱ्या प्रश्नांनंतर अनुक्रमे तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीत समाविष्ट करण्यात येतील.**

**तसेच या सचिवालयातील ई-१ कक्षात (कक्ष क्रमांक १३०४) मा.सदस्यांना वा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधींना तारांकित प्रश्नांचे प्रपत्र उपलब्ध करुन देण्यात येतील. प्रत्येक अधिवेशनासाठी या सचिवालयाकडून स्वतंत्रपणे छापण्यात येणाऱ्या तारांकित प्रश्नांच्या प्रपत्रातच प्रश्न सूचना देण्यात याव्यात. प्रत्येक अधिवेशनासाठी छापण्यात येणाऱ्या तारांकित प्रश्नांच्या प्रपत्रात प्रश्न सूचना देण्यात आल्या नसल्यास, त्या सूचना रद्द करण्यात येतील.**

### विवरणपत्र

| गट क्रमांक (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| एक | (१) उपमुख्य मंत्री<br>(२) राज्य उत्पादन शुल्क आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री<br>(३) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री<br>(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण आणि राजशिष्टाचार मंत्री<br>(५) क्रीडा व युवक कल्याण मंत्री<br>(६) पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य मंत्री<br>(७) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्री | सोमवार, दिनांक २ जून, २०१४<br>सोमवार, दिनांक ९ जून, २०१४<br>सोमवार, दिनांक १६ जून, २०१४<br>सोमवार, दिनांक २३ जून, २०१४ | शुक्रवार, दिनांक २ मे, २०१४<br>शुक्रवार, दिनांक ९ मे, २०१४<br>शुक्रवार, दिनांक १६ मे, २०१४<br>शुक्रवार, दिनांक २३ मे, २०१४ |

\\Mls-e1-01\e\Malankar\ALL SESSION\2 session 2014\rotation order.doc

मचवी २६५१(८००-३-२०१४)-२.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दोन | (१) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) आणि पर्यटन मंत्री<br>(२) गृह मंत्री<br>(३) कृषी व पणन मंत्री<br>(४) सहकार व संसदीय कार्य मंत्री<br>(५) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री<br>(६) अन्न व औषध प्रशासन मंत्री | | मंगळवार, दिनांक ३ जून, २०१४<br>मंगळवार, दिनांक १० जून, २०१४<br>मंगळवार, दिनांक १७ जून, २०१४<br>मंगळवार, दिनांक २४ जून, २०१४ | शनिवार, दिनांक ३ मे, २०१४<br>शुक्रवार, दिनांक ९ मे, २०१४<br>शनिवार, दिनांक १७ मे, २०१४<br>शुक्रवार, दिनांक २३ मे, २०१४ |
| तीन | (१) मुख्यमंत्री<br>(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री<br>(३) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री | | बुधवार, दिनांक ४ जून, २०१४<br>बुधवार, दिनांक ११ जून, २०१४<br>बुधवार, दिनांक १८ जून, २०१४<br>बुधवार, दिनांक २५ जून, २०१४ | शनिवार, दिनांक ३ मे, २०१४<br>शुक्रवार, दिनांक ९ मे, २०१४<br>शनिवार, दिनांक १७ मे, २०१४<br>शुक्रवार, दिनांक २३ मे, २०१४ |
| चार | (१) उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार मंत्री<br>(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री<br>(३) शालेय शिक्षण मंत्री<br>(४) वस्त्रोद्योग, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्री<br>(५) कामगार आणि विशेष सहाय्य मंत्री<br>(६) रोजगार हमी योजना आणि जलसंधारण मंत्री<br>(७) महिला व बालविकास मंत्री | | गुरुवार, दिनांक ५ जून, २०१४<br>गुरुवार, दिनांक १२ जून, २०१४<br>गुरुवार, दिनांक १९ जून, २०१४<br>गुरुवार, दिनांक २६ जून, २०१४ | सोमवार, दिनांक ५ मे, २०१४<br>सोमवार, दिनांक १२ मे, २०१४<br>सोमवार, दिनांक १९ मे, २०१४<br>सोमवार, दिनांक २६ मे, २०१४ |
| पाच | (१) सामाजिक न्याय, विमुक्त भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण आणि व्यसनमुक्ती कार्य मंत्री.<br>(२) आदिवासी विकास मंत्री.<br>(३) वने,पुनर्वसन व मदत कार्य आणि भुकंप पुनर्वसन मंत्री<br>(४) ग्रामविकास मंत्री.<br>(५) महसुल व खारजमिन मंत्री<br>(६) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री. | | शुक्रवार, दिनांक ६ जून, २०१४<br>शुक्रवार, दिनांक १३ जून, २०१४<br>शुक्रवार, दिनांक २० जून, २०१४<br>शुक्रवार, दिनांक २७ जून, २०१४ | मंगळवार, दिनांक ६ मे, २०१४<br>मंगळवार, दिनांक १३ मे, २०१४<br>मंगळवार, दिनांक २० मे, २०१४<br>मंगळवार, दिनांक २७ मे, २०१४ |

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २४ मार्च, २०१४.

डॉ.अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

प्रति :

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व मा. सदस्य.
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

## मंत्र्यांची नावे व त्यांच्या अधीन असलेले विभाग

(१) **श्री. पृथ्वीराज दाजीसाहेब चव्हाण ---- मुख्यमंत्री**

(१) सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार विषयक बाबी वगळून)
(२) नगरविकास विभाग
(३) गृहनिर्माण विभाग
(४) गृह विभाग (परिवहन विषयक बाबी)
(५) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (खनिकर्म विषयक बाबी)
(६) मराठी भाषा विभाग
(७) विधी व न्याय विभाग आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विषय

(२) **श्री. अजित अनंतराव पवार --- उप मुख्यमंत्री**

(१) वित्त विभाग
(२) नियोजन विभाग (रोजगार हमी योजना विषयक बाबी वगळून)
(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा (नवीन व नवीकरणीय ऊर्जा विषयक बाबी वगळून))
(४) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (वैद्यकीय शिक्षणविषयक बाबी)
(५) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग (फलोत्पादन विषयक बाबी)

(३) **श्री. नारायण तातू राणे --- उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार मंत्री**

(१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग विषयक बाबी)
(२) गृह विभाग (बंदरे विषयक बाबी)
(३) रोजगार व स्वयंरोजगार विभाग

(४) **श्री. छगन चंद्रकांत भुजबळ --- सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून ) आणि पर्यटन मंत्री**

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम विषयक बाबी वगळून)
(२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (पर्यटन विषयक बाबी)

(५) **श्री. रावसाहेब रामराव पाटील उर्फ आर.आर.पाटील --- गृह मंत्री**

गृह विभाग

(६) **श्री. शिवाजीराव शिवरामजी मोघे --- सामाजिक न्याय, विमुक्त /भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण आणि व्यसनमुक्ती कार्य मंत्री**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य (सामाजिक न्याय, विमुक्त /भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण आणि व्यसनमुक्ती कार्य विषयक बाबी)

(७) **श्री.मधुकरराव काशिनाथ पिचड --- आदिवासी विकास मंत्री**

आदिवासी विकास विभाग

(८) **डॉ.पतंगराव श्रीपतराव कदम --- वने, पुनर्वसन व मदत कार्य आणि भुकंप पुनर्वसन मंत्री**

महसूल व वन विभाग (वने, पुनर्वसन व मदत कार्य आणि भुकंप पुनर्वसन विषयक बाबी)

(९) **श्री. गणेश रामचंद्र नाईक --- राज्य उत्पादन शुल्क आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री**

(१) गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क विषयक बाबी)
(२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (नवीन व नवीकरणीय ऊर्जा विषयक बाबी)

(१०) **श्री. राधाकृष्ण एकनाथराव विखे-पाटील --- कृषी व पणन मंत्री**

(१) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग (कृषी विषयक बाबी)
(२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (पणन विषयक बाबी)

(११) **श्री. जयंत राजाराम पाटील--- ग्रामविकास मंत्री**

ग्रामविकास व जलसंधारण विभाग (ग्रामविकास विषयक बाबी)

(१२) **श्री. हर्षवर्धन शहाजीराव पाटील --- सहकार आणि संसदीय कार्य मंत्री**

(१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (सहकार विषयक बाबी)
(२) संसदीय कार्य विभाग

कृ.मा.प.

(१३) **श्री. जयदत्त सोनाजीराव क्षीरसागर ---सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम विषयक बाबी)

(१४) **श्री. मनोहरराव राजूसिंग नाईक --- अन्न व औषध प्रशासन मंत्री**
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (अन्न व औषध प्रशासन विषयक बाबी)

(१५) **श्री. अनिल वसंतराव देशमुख --- अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री**
अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग

(१६) **श्री. सुनिल दत्तात्रय तटकरे --- जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री**
जलसंपदा विभाग (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ विषयक बाबी वगळून)

(१७) **श्री. विजय उर्फ बाळासाहेब भाऊसाहेब थोरात --महसूल व खार जमीन मंत्री**
(१) महसूल व वन विभाग (महसूल विषयक बाबी)
(२) जलसंपदा विभाग (खारजमीन विषयक बाबी)

(१८) **श्री. राजेश अंकुशराव टोपे --- उच्च व तंत्र शिक्षण मंत्री**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

(१९) **श्री. राजेंद्र जवाहरलाल दर्डा --- शालेय शिक्षण मंत्री**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (शालेय शिक्षण विषयक बाबी)

(२०) **श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान --- वस्त्रोद्योग, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ मंत्री**
(१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (वस्त्रोद्योग विषयक बाबी)
(२) अल्पसंख्यांक विकास विभाग (अल्पसंख्यांक विकास व औकाफ विषयक बाबी)

(२१) **श्री. हसन मियालाल मुश्रीफ --- कामगार आणि विशेष सहाय्य मंत्री**
(१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (कामगार विषयक बाबी)
(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (विशेष सहाय्य विषयक बाबी)

(२२) **श्री.सुरेश हिरायेन्ना शेट्टी ---सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण आणि राजशिष्टाचार मंत्री**
(१) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग
(२) सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार विषयक बाबी)

(२३) **डॉ. नितीन काशिनाथ राऊत --- रोजगार हमी योजना आणि जलसंधारण मंत्री**
(१) नियोजन विभाग (रोजगार हमी योजना विषयक बाबी)
(२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग (जलसंधारण विषयक बाबी)

(२४) **श्री.पद्माकर विजयसिंग वळवी ---- क्रीडा व युवक कल्याण मंत्री**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (क्रीडा व युवक कल्याण विषयक बाबी)

(२५) **प्रा.(श्रीमती) वर्षा एकनाथ गायकवाड --- महिला व बाल विकास मंत्री**
महिला व बालविकास विभाग

(२६) **श्री. मधुकरराव देवराव चव्हाण --- पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री**
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग (कृषी विषयक बाबी वगळून)

(२७) **श्री.संजय वामनराव देवतळे ---- पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य मंत्री**
(१) पर्यावरण विभाग
(२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (सांस्कृतिक कार्य विषयक बाबी)

(२८) **श्री.दिलीप गंगाधर सोपल --- पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(२९) **श्री. शशिकांत जयवंतराव शिंदे--- जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्री**
जलसंपदा विभाग (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ विषयक बाबी)

---